श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-४ | एप्रिल-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## श्रीशिवजयंती सोहळा शिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण

शिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणेच; श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा, श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांनी प्रवर्तित केलेला शिवजयंती उत्सव अत्यंत उल्हासात आणि जोषात साजरा झाला. फाल्गुन वद्य ३, शक १९४०; शनिवार, दि. २३ मार्च २०१९ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सभास्थानी ब्रह्मवृंदाकडून शांतिसूक्तपठण आणि ईशस्तवन झाल्यावर अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार यांचा आणि अन्य वक्त्यांचा विकास वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

त्यानंतर आपल्या परिसरातील गरजू लोकांना वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात आणून त्यांना सातत्याने मदत करणाऱ्या सुमित्रा कांबळे (सिंधुदुर्ग), मानसी कुलापकर (दापोली) आणि सदाशिव घाग (खरवते) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा पेला आणि पुष्पगुच्छ देऊन ट्रस्टतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच सातवीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपले माध्यमिक शिक्षण सुरू ठेवणाऱ्या हडकणी आणि डेरवणच्या बारा मुलींना प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून मनगटी घड्याळे देण्यात आली.

मा. श्री. शशिकांतभाऊ सुतार यांनी सर्वप्रथम सभेला संबोधित करताना श्रीशिवछत्रपतींच्या कार्याचे महत्त्व विशद करून डेरवण येथे श्रीसहजानंदसरस्वती महाराजांनी केलेल्या विविधांगी कार्याचा गौरव केला. डेरवण येथील कार्यामागे परमेश्वरी अधिष्ठान, श्रीमहाराजांची प्रेरणा आणि कार्यकर्त्यांचे अपार कष्ट आहेत असे त्यांनी सांगितले. श्रीमती हर्षदा जोशी यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या परस्पर संबंधांवर प्रकाश टाकला. प्रा. सचिन कानिटकर यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांचे




*डॉ. मुकुंद दातार यांचे अध्यक्षीय भाषण*




मानसी कुलापकर यांचा सत्कार



सकल विश्व सुखी व्हावे ।

जीवन आजवर सर्वांना कसे प्रेरणा देत आले आहे याचे दाखले देत, महाराजांना केवळ देवत्व देऊन भागणार नाही तर त्यांच्या देवत्वाचा अंश अंगी बाणविण्याचा प्रयत्न करा असे आग्रहाने प्रतिपादन केले. डेरवणला सुरू असलेले कार्य शिवछत्रपतींपासून प्रेरणा घेऊनच सुरू आहे. छत्रपती एकच झाले, आपण निदान मावळे होण्याचा तरी प्रयत्न केला पाहिजे असे ते म्हणाले.

प्रमुख वक्ते श्री. सुनीलबापू लाड म्हणाले, ''राजसत्ता आणि धर्मसत्ता ही एकाच रथाची दोन चाके आहेत. धर्मसत्तेच्या नियंत्रणामुळे राजसत्ता अराजकापासून वाचते. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता परस्पर समांतर चालल्या पाहिजेत. नि:स्पृह संतसत्तेच्या मार्गदर्शनामुळे राजसत्ता मार्गभ्रष्ट होत नाही. डेरवणला चाललेले कार्य हेही संतांच्या मार्गदर्शनाखाली चाललेले आहे.''

आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्वप्रथम डॉ. दातार यांनी डेरवणचा परिसर आणि तेथील कार्य या विषयी आपल्या मनात आलेल्या कौतुकाच्या भावनेला शब्दात व्यक्त केले.'शिवरायांचे भव्य जीवन आणि भावजीवन' या विषयावर बोलताना ते म्हणाले की शिवरायांच्या जीवनाची भव्यता नेमक्या शब्दात मांडणे कठीण आहे. त्यांचे जीवन हेच काव्य आहे. ते स्फूर्तिदायक आहे. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन त्यांच्यानंतर राजाराम महाराजांनी सत्तावीस वर्षे कठीण परिस्थितीत लढा दिला. औरंगझेब दिल्लीला परत जाऊ शकला नाही. मात्र छत्रपतींच्या जीवनात प्रत्येक मोठ्या विजयाच्या वेळी त्यांना कौटुंबिक दु:खाला सामोरे जावे लागले. आपले विचार सोदाहरण स्पष्ट करून भाषणाच्या अखेरीस डेरवणची शिवजयंती सातत्याने सुरू असल्यामुळे संततधारेप्रमाणे ती समाजमनावर नक्कीच परिणाम करील असा विश्वास व्यक्त केला.

प्रा. सु. ग. शेवडे यांनी सभेचे सूत्रसंचालन केले. त्यानंतर आभारप्रदर्शन आणि वरयाचना होऊन सभेची सांगता झाली. सायंकाळी साडेसहा वाजता क्रीडासंकुलापासून शिवसमर्थगडापर्यंत श्रीशिव छत्रपतींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या नेत्रदीपक मिरवणुकीची सांगता रात्रौ दहा वाजता शिवसमर्थ गडात झाली.



भव्य मिरवणूक

# डॉ. श्रीपाद बाणावली यांचा 'महाराष्ट्रियन ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मान



*डॉ. श्रीपाद बाणावली (डावीकडून पहिले) पुरस्कार स्वीकारताना*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या भ. क. ल. वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण येथे अनेक कर्करोगग्रस्तांना नवसंजीवनी देऊन, त्यांच्या मनात आनंद निर्माण करून, जगण्याची ऊर्मी निर्माण करणारे डॉ. श्रीपाद बाणावली यांना दि. २४.०२.२०१९ या दिवशी 'महाराष्ट्रियन ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय रेल्वे मंत्री मा. पीयूष गोयल, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले, पद्मभूषण डॉ. सुरेश अडवाणी, लोकमत ग्रुपचे अध्यक्ष विजय दर्डा, युपीएल लि.चे ग्लोबल सीईओ जयदेव श्रॉफ, रॉनी स्क्रुवाला, फेसबुक इंडिया मिडीयाचे हेड अंकुर मेहरा, क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, चित्रपट निर्माता-दिग्दर्शक महेश मांजरेकर, चित्रपट अभिनेता सचिन खेडेकर, लोकमत समुहाचे एडिटोरियल अँड जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर ऋषी दर्डा, जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल व आर. के. होम सोल्युशन्स मार्केटिंग आणि कन्सल्टन्सीचे एम. डी. राजेश खानविलकर या सर्व मान्यवर परिक्षक मंडळाने या वर्षीच्या 'लोकमत' वृत्तसमूहाकडून दिल्या गेलेल्या या पुरस्कारासाठी डॉ. श्रीपाद बाणावली यांची निवड केली.

कॅन्सरच्या रुग्णांवरचे उपचार अत्यंत खार्चिक असल्यामुळे लहान मुलांवर करण्यात येत असलेले उपचार त्यांचे पालक अर्धवट सोडून देतात ही गोष्ट लक्षात येताच अमेरिकेतील मोठ्या पगाराची नोकरी सोडून आपल्या देशातील कॅन्सरग्रस्त मुलांवर उपचार करता यावेत यासाठी ते मायदेशी परतले आणि मुंबईच्या 'टाटा मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल'मध्ये रुग्णसेवा करू लागले. अल्प खर्चात उपचार घेता यावेत यासाठी त्यांनी 'लो कॉस्ट मेट्रोनोमिक किमोथेरपी' ही उपचारपद्धती विकसीत केली. तसेच गरीब रुग्णांना विविध शासकीय योजनांमधून आर्थिक साहाय्य मिळावे यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे कर्करोगग्रस्त रुग्णांमध्ये रोगमुक्त होण्याच्या प्रमाणात लक्षणीय सुधारणा झाली आहे

या सत्कारानंतर आपले मनोगत व्यक्त करतांना सर्वप्रथम आपल्या गुरूंचे ऋण मान्य करून, आपल्या रुग्णांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे आभार मानताना ते म्हणाले की आपणाला त्यांच्या प्रोत्साहनामुळे उपचार करण्यासाठी प्रेरणा मिळते. टाटा रुग्णालयात काम करताना पुण्य मिळविण्यासाठी वेगळे काही करावे लागत नाही. आपोआपच सेवा घडत असते.

डॉ. बाणावली हे 'टाटा मेमोरियल सेंटर' मध्ये मेडिकल व पिडीयाट्रीक ऑन्कॉलॉजी विभागाचे प्रमुख आहेत. याशिवाय याच सेंटरच्या 'आऊट रिच प्रोग्राम'चे समन्वयक असून वैद्यकीय क्षेत्रात पस्तीसहून अधिक वर्षे कार्यरत आहेत. केवळ वैद्यकीय क्षेत्रात रमणाऱ्या या आदरणीय व्यक्तिमत्वास संगीत, क्रीडा व काव्यक्षेत्राचीही आवड आहे. डॉ. श्रीपाद बाणावली यांना वालावलकर रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून त्यांच्या पुढील कार्यासाठी व रुग्णसेवेसाठी हार्दिक शुभेच्छा.

# जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रियांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिवर्षी ८ मार्च हा दिवस सर्वत्र जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जाते. स्त्रियांच्या हक्काविषयी, त्यांच्या समस्यांविषयी जागृती निर्माण करणे तसेच देशाप्रती आणि समाजाप्रती त्यांनी दिलेल्या योगदानाविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा यामागचा उद्देश आहे. आपल्या संस्कृतीत 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते। रमन्ते तत्र देवता ।।' अशा शब्दात स्त्रीचा गौरव केलेला आहे. म्हणजे प्राचीन काळापासून स्त्रियांचा सन्मान करण्याची आपली परंपरा आहे. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा प्रत्यय येतोच असे नाही. स्त्रियांच्या समस्यांकडे समाज द्यावे तसे लक्ष देतोच असे नाही. स्त्रियाही आपल्या समस्यांच्या सोडवणुकीविषयी आग्रही भूमिका घेत नाहीत. प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडताना स्वत:च्या आरोग्याकडे त्या पुरेसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे अनेक स्त्रिया अनारोग्याच्या बळी होतात.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्त्रियांच्या आरोग्याविषयी समाजामध्ये आणि स्त्रियांमध्ये जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने 'फिनोलेक्स इंडस्ट्रीज' व 'मुकुल माधव फौन्डेशन' यांनी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या सहयोगाने दि. ०१ मार्च २०१९ ते दि. १५ मार्च २०१९ या कालावधीत 'वुमन्स वेल बिईंग' शिबिर अर्थात स्त्रियांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. स्त्री रुग्णाचे केवळ शंभर रुपये योगदान व उर्वरित रक्कमेसाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे योगदान अशा स्वरूपात १५ दिवसांच्या कालावधीचे हे शिबिर भरविण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात सोनोमॅमोग्राफी, सोनोग्राफी, ब्लड टेस्ट (सीबीसी, ब्लडशुगर,) युरिन, ब्रेस्ट क्लिनीकल एक्झामिनेशन, गायनॅकॉलॉजिकल एक्झामिनेशन, फिजिओथेरपी व डाएट कन्सलटेशन करण्यात आले. या शिबिराचा लाभ एकूण ५६९ स्त्रियांनी घेतला. फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फौन्डेशन यांच्या सहकार्याने भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाने हाती घेतलेल्या या उपक्रमाला स्त्री वर्गाकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. स्त्री शक्तीला विनम्र अभिवादन!



*जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिर*

# डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग यांची डेरवण रुग्णालयाला भेट


*डॉ. लॅन्ग (डावीकडून पहिले) यांना ट्रस्टच्या कार्याविषयी सादरीकरण देताना डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य*

डॉ. ख्रिस्टॉफ लॅन्ग (Chief Physician, Department of Urology, Hospital Sulzbach, Knappschaftsklinikum Saar GmbH, Germany ) यांनी दि. ३ ते ७ मार्च या काळात मुंबईचे युरो-सर्जन डॉ. सतेज सबनिस यांच्यासह डेरवण रुग्णालयाला भेट दिली. डॉ. लॅन्ग यांनी डॉ. सबनिस यांच्यासह रुग्णालयात अनेक शस्त्रक्रिया केल्या. रुग्णालयातील बेसिक सर्जिकल लॅब पाहून ते अतिशय प्रभावित झाले. रुग्णालयातील आरोग्यचिकित्सेविषयीच्या अत्याधुनिक सोयी पाहून त्यांनी संतोष व्यक्त केला. दि. २८ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०१९ या काळात ते डेरवण येथे 'युरॉलॉजी वर्कशॉप' घेणार असून भारतातील डॉक्टरांसाठी ती प्रशिक्षणाची सुवर्णसंधी ठरेल.


डॉ. लॅन्ग यांनी 'एसव्हीजेसीटी' संस्थेच्या शाळेला भेट देऊन जर्मन भाषेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी बातचीत केली. त्या वेळी मुलांनी जर्मन भाषेत नाटिका आणि गाणी सादर केली. त्यांची ही भेट मुलांसाठी संपन्न करणारा अनुभव देणारी ठरली.

वालावलकर रुग्णालय, नर्सिंग कॉलेज, वैद्यकीय महाविद्यालय, क्रीडासंकूल आदी पाहून त्यांनी नोंदविलेला अभिप्राय आणि त्याचा मराठी अनुवाद –

''येथे असलेल्या शैक्षणिक, आरोग्य व क्रिडा क्षेत्रातील विस्मयकारक असलेल्या सर्व सुविधा मनाला भावल्या. संस्थेच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. येथे पुन्हा येण्याच्या संधीची आम्ही वाट पहात आहोत.''



*जर्मन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद*



Visitor's Book

| Date | Name & Address / E-mail | Phone | Remarks |
|---|---|---|---|
| 3.3-7.3.2019 | Dr. CHRISTOPH LANG /Germany Christoph.Lang@KKSaar.de | | Wer hat an der Uhr gedreht<br>Ist es wirklich schon so spät<br>Stimmt es, dass ich gehen muss<br>Ist für heute wirklich Schluss?<br>Heute ist nicht alle Tage<br>Ich komme wieder – keine Frage!<br>Time is fleeting, but the conditions will bring me back to this once in a lifetime expe and God's place on earth. |





# पाचव्या डेरवण क्रीडा-महोत्सवाला युवा क्रीडापटूंचा उत्साही प्रतिसाद

श्रीशिव-समर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवानिमित्ताने 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'च्या क्रीडासंकुलात 'डेरवण यूथ गेम्स'चे आयोजन करण्यात येते. या वर्षीच्या पाचव्या 'डेरवण यूथ गेम्स'चे शानदार उद्‌घाटन नेमबाजीतील अर्जुन पुरस्कार विजेत्या तेजस्विनी सावंत यांच्या हस्ते दि. १६ मार्च २०१९ रोजी करण्यात आले. आन्तरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू माणिक परांजपे आणि कांचन साने, आन्तरराष्ट्रीय टेबल-टेनिसपटू पूजा सहस्रबुद्धे यांच्या उपस्थितीत झालेल्या समारंभाला सायंकाळी पाच वाजता प्रमुख पाहुण्या तेजस्विनी सावंत यांच्या हस्ते क्रीडाध्वज उभारून सुरुवात झाली.

इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी आणि स्पर्धेतील सहभागी खेळाडू तसेच नूतन मराठी विद्यालय, पुणे यांच्या विद्यार्थिनींचे घोषपथक यांच्या दिमाखदार संचलनानंतर; श्रीशिवसमर्थगड येथे मा. तुकाराम मेस्त्री, माजी सरपंच, धामापूर यांनी प्रज्वलित केलेली क्रीडाज्योत शाळेच्या राष्ट्रीय खेळाडूंनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात संकुलाच्या भव्य मैदानात आणली आणि पूजा सहस्रबुद्धे यांच्या शुभहस्ते क्रीडा-मशाल प्रज्वलित करण्यात आली. राष्ट्रीय धावपटू आर्या सिनकर हिने खेळाडूंना क्रीडा-शपथ दिली.



*कार्यकारी विश्वस्त विकास वालावलकर प्रास्ताविक भाषण करताना*

क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांनी आपल्या प्रास्ताविकात गत वर्षातील संकुलातील क्रीडा घडामोडींचा आढावा घेऊन पाहुण्यांचा परिचय करून दिल्यावर शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव आणि आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले.

माणिक परांजपे यांनी खेळाडूंना उद्देशून आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की चाळीस वर्षांपूर्वी जेव्हा त्यांनी क्रीडाक्षेत्रात यश मिळवले, त्या वेळी आजच्यासारख्या सोयी नव्हत्या, तसेच प्रशिक्षकांचे फारसे मार्गदर्शनही मिळत नव्हते. मात्र सर्वच खेळांमध्ये समरसून भाग घेतल्यामुळे शारीरिक क्षमता उत्तम राहिली. खेळामुळे बुद्धीची वाढच होते. खेळाचे अनेक दीर्घकालीन फायदे आहेत. पालकांनी मुलांच्या अभ्यासाचा बाऊ न करता येथे उपलब्ध सोयींचा उपयोग करून मुलांना खेळात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.



*प्रमुख पाहुणे आदिल सुमारीवाला युवा क्रीडापटूंना मार्गदर्शन करताना*

पूजा सहस्रबुद्धे यांनी आपल्या भाषणात पालकांना आवाहन केले की मुलांना मोठी स्वप्ने बघू द्यावीत आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी पालकांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहावे. यानंतर पाचव्या डेरवण गेम्सचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा करून तेजस्विनी सावंत यांनी आपल्यासमोर बसलेल्या युवा स्पर्धकांशी बोलतांना, ''आपण नेहमी जिंकत नाही पण पराभव हाही आपल्याला काहीतरी शिकवीत असतो. खेळाडूमागे त्याचे पालक, शिक्षक, क्रीडाप्रशिक्षक आणि सहकारी यांचे टीमवर्क असते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपण विजयी होतो आणि आपले राष्ट्रगीत वाजते तो क्षण अंगावर रोमांच उभे करणारा असतो. त्या क्षणासाठी खेळत रहा, सतत खेळत राहा'' असे आवाहन करून त्यांनी आपले भाषण संपविले.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध रंगतदार नृत्यांनी या कार्यक्रमाची सांगता झाली. या समारंभाला एसव्हीजेसीटीचे प्रमुख विश्वस्त श्री अशोक रघुनाथ जोशी, शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव, आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, क्रीडाक्षेत्रातील कार्यकर्ते संदीप तावडे, रणजीत चामले, सुमंत वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेच्या निमित्ताने भरविण्यात आलेल्या, ऑलिम्पिक स्पर्धेची संपूर्ण माहिती देणाऱ्या चित्रप्रदर्शनाचे उद्‌घाटन कांचन साने यांनी केले, तर 'क्रीडा प्रेरणा व्यासपीठ' या उपक्रमाद्वारे चालणाऱ्या क्रीडा-विषयक चर्चासत्राचे उद्घाटन माणिक परांजपे यांच्या शुभहस्ते झाले.

या स्पर्धांमध्ये १८ क्रीडाप्रकारांमधील १५४ उपप्रकारांमध्ये चुरशीच्या लढतीत चार हजारपेक्षा जास्त खेळाडू सहभागी झाले होते. १२ लाखापेक्षा अधिक रकमेची रोख बक्षिसे, पदके, चषक आणि प्रमाणपत्रे देऊन खेळाडूंच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. निवास आणि भोजन व्यवस्था उत्तम होती. मोठ्या प्रमाणावर रोख बक्षिसे आणि सुंदर पदके, नेटके नियोजन यामुळे सर्वच खेळाडू स्पर्धेच्या संयोजनाबद्दल आनंद व्यक्त करीत होते. ऑलिम्पिकसंबंधी माहितीपूर्ण प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.




'क्रीडा प्रेरणा व्यासपीठा'वर क्रीडाक्षेत्रासंबंधी विविध विषयांवर क्रीडापटू आणि क्रीडावैद्यक शास्त्रातील तज्ज्ञांची माहितीपूर्ण व्याख्याने आणि खेळाडूंसोबत चर्चासत्रे, प्रश्नोत्तरे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सराव कसा करावा, दुखापती कशा टाळाव्यात, मानसिक तयारी कशी करावी, पौष्टिक आहार, डोपिंगची समस्या अशा अनेक विषयांवर माणिक परांजपे, कांचन साने, पूजा सहस्रबुद्धे, तेजस्विनी सावंत, डॉ. भारती शर्मा, फिजिओथेरपिस्ट मेघना पालखेडे, न्युट्रिशिअन स्वाती भोसकी, डॉ. नताशा कानविंदे, डॉ. नंदन कानविंदे, दामिनी सप्रे, डॉ. शर्मिला कानविंदे आदींनी मार्गदर्शन केले. वालावलकर मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी पथनाट्येही सादर केली. एव्हरेस्टवीर भगवान चावले यांनी गिर्यारोहणासंबंधी आपले अनुभव सांगितले तर स्क्वा. लिडर संजय देशमुख यांनी सैन्यदलातील प्रवेशासाठी कशी तयारी करावी याविषयी विवेचन केले.

आठ दिवस रंगलेल्या राज्यस्तरीय भव्य क्रीडामहोत्सवाचा सांगता समारंभ आणि पारितोषिक वितरण सोहळा संस्थेच्या क्रीडासंकुलात शनिवार, दि. २३ मार्च रोजी सायंकाळी उत्साहाने पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध ॲथलीट, अर्जुन पुरस्कारविजेते, ऑलिम्पिकपटू आदिल सुमारीवाला खास उपस्थित



होते. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना यावेळी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

एसव्हीजेसिटीचे कार्यकारी विश्वस्त विकास वालावलकर यांच्या हस्ते, आदिल सुमारीवाला यांचा सन्मान करण्यात आला. तर एसव्हीजेसिटीचे प्रमुख विश्वस्त अशोक रघुनाथ जोशी यांच्या हस्ते, आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक आणि शिवछत्रपती पुरस्कारविजेते रणजीत चामले आणि महाराष्ट्र खोखो असोसिएशनचे अध्यक्ष संदीप तावडे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी केशव सप्रे यांचा सन्मान करण्यात आला.



विकास वालावलकर यांनी गेल्या पाच वर्षात डेरवण यूथ गेम्समध्ये स्पर्धकांच्या वाढलेल्या सहभागाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, की ऑलिम्पिकसारख्या जागतिक स्पर्धेमध्ये आपल्या देशाचे खूप कमी खेळाडू चमकताना दिसतात. क्रिकेटप्रमाणे इतर खेळांना वाव मिळावा म्हणून डेरवण येथे या स्पर्धांचे आयोजन केले जाते. सर्वच गोष्टी सरकारने कराव्यात ही अपेक्षा न करता स्वतः कार्यरत व्हावे या सद्गुरू सहजानंद सरस्वती महाराजांच्या विचारानुसार हे कार्य सुरू आहे. या क्रीडासंकुलात गेल्या वर्षी ॲथलेटिक्सच्या दोन राष्ट्रीय स्पर्धा झाल्या. ग्रामीण भागात हा क्रीडाविकास होतोय याचा आनंद होतो.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

खेळाडूंनी आणि विद्यार्थ्यांनी १०० टक्के स्वतःला झोकून देऊन खिलाडूवृत्तीने अभ्यास किंवा खेळात कार्यरत व्हावे आणि यशस्वितेकडे वाटचाल करावी. केवळ सरावाने अचूकता येत नाही, तर निर्दोष सरावानेच अचूकता येते आणि त्यातूनच उत्तम खेळाडू घडतो, असे प्रतिपादन आदिल सुमारीवाला यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

यानंतर स्पर्धेचा ध्वज उतरविण्यात येऊन आदिल सुमारीवाला यांच्या हस्ते तो क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर यांच्याकडे पुढील स्पर्धेसाठी सुपूर्द करण्यात आला. एसव्हीजेसिटी शाळेच्या विद्यार्थ्यांनी या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. एसव्हीजेसिटी शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी खांडेकर यांनी केले.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून एप्रिल २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ६ एप्रिल | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टिक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| १४ एप्रिल | डॉ. शिवप्रसाद दाते (प्लॅस्टिक सर्जन) | भाजलेले व्रण डाग - शस्त्रक्रिया व उपचार |
| २० एप्रिल | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २० एप्रिल | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २० एप्रिल | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक)<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालय, डेरवण येथे.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे | त्वचारोग तज्ज्ञ |
| २० एप्रिल | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |
| २० एप्रिल | डॉ. अनिरुद्ध कुलकर्णी, एम.डी. रेडिओलॉजिस्ट | इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी तपासणी शिबिर |
| २० एप्रिल | डॉ. भावेश पोपट, एम. डी.रेडिओलॉजिस्ट | इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी तपासणी शिबिर |
| २० एप्रिल | डॉ. सचिन विलेकर, डायबेटीक स्पेशालिस्ट | डायबेटीक फूट उपचार |
| २१ एप्रिल | डॉ. के.मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| २१ एप्रिल | डॉ. किरण साठे (नेफ्रोलॉजिस्ट) | लहान मुलांचे किडनी विकार तज्ज्ञ |
| २८ एप्रिल | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाच्या विकाराचे तज्ज्ञ |
| | डॉ.के.एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.
RHTC येथे - २४ एप्रिल - डोहाळेजेवण, सासू-सून मेळावा, २७ एप्रिल - सहा महिन्यांचे वाढदिवस,
वालावलकर रुग्णालय येथे - २५ एप्रिल - डोहाळेजेवण, सासू-सून मेळावा, २८ एप्रिल - सहा महिन्यांचे वाढदिवस, सरपंच मेळावा - २६ एप्रिल

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर